# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डी मेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ८६५२२८१०२६

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001
Website:www.msbnpe.orgE-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- 8652281026

मराशुपशिमं / परिपत्रक / 3614 /२०२२ दिनांक:-०७/०७/२०२२

परिपत्रक

प्रति,
प्राचार्या/संस्था प्रमुख
सर्व मान्यता प्राप्तए.एन.एम./जी.एन.एम./एल.एच.व्ही./पोस्ट सर्टीफिकेट परिचर्या संस्था,
महाराष्ट्र राज्य

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता निरिक्षण व ॲफिलेशन शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणेबाबत..

महोदय,

राज्यातील सर्व मान्यताप्राप्त परिचर्या प्रशिक्षण संस्थांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते कि, सन २०१३ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, प्रकरण चार कलम २७ ते ३४ नुसार मान्यताप्राप्त परिचर्या संस्थेची तपासणी मंडळामार्फत ३ वर्षातून एकदा करण्यात येते. त्यानुसार मान्यता प्राप्त परिचर्या संस्थांनी ज्यांचे निरिक्षण शुल्क शैक्षणिक वर्ष २०१९-२० या सालात भरलेले आहे अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये संलग्नता घेण्यासाठी व ज्या संस्थांची एक तुकडी उत्तीर्ण होऊन बाहेर पडलेली नाही त्या संस्थांनी सुध्दा निरिक्षण शुल्क रु. २५०००/- दि. ०६/०७/२०२२ ते दि. ०५/०८/२०२२ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने भरणा करावी.

तसेच सर्व मान्यता प्राप्त संस्थांनी खालील प्रमाणे त्यांच्याकडील प्रत्येक अभ्यासक्रमाची नियमित ॲफिलेशन /संलग्नता शुल्क दि. ०६/०७/२०२२ ते दि. ०५/०८/२०२२ पर्यत मंडळाकडे (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता) ऑनलाईन पध्दतीने भरावे. (दि.०५/०८/२०२२ नंतर निरिक्षण व ॲफिलेशन शुल्कासाठी विलंब झाल्यास प्रती दिन रु.१००/- प्रमाणे शुल्क भरावे लागेल, ही मुदतवाढ फक्त १५ दिवसांकरिता आहे त्या पुढे मुदतवाढ देता येणार नाही याची नोंद घ्यावी) अन्यथा सदर संस्थांना अभ्यासक्रमाची मान्यता देण्यात येणार नाही.

१. जी.एन.एम. व ए.एन.एम. अभ्यासक्रमासाठी संलग्नता शुल्क रु.५०००/- प्रत्येकी
२. पोस्ट सर्टिफिकेट कोर्सेससाठी संलग्नता शुल्क रु. १०,०००/- प्रत्येकी

फक्त मान्यता प्राप्त/मंडळाची संलग्नता असलेल्या संस्थानी प्रत्येक वर्षी ॲफिलेशन शुल्क तसेच ३ वर्षातून एकदा निरीक्षण शुल्क भरणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

मंडळाच्या मान्यते शिवाय कोणत्याही अभ्यासक्रमाची तुकडी प्रवेशीत करु नये केल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस मंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता मंडळाकडे वाढीव जागेकरिता ज्या संस्थानी प्रस्ताव दाखल केलेल आहेत. अशा संस्थानी देखील सदर नमुद केलेल्या लिंक वर जाऊन तपासणी शुल्क रु. २५०००/- ऑनलाईन पध्दतीने भरावे.**

**टिप:- ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरण्यासाठी पुढील दर्शिवलेल्या पध्दतीचा वापर करण्यात यावा.**
**संपर्क दूरध्वनी क्रमांक:- ८९७६२७९९३१**

संचालक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

(पुढे पहा)

**MSBNPE (Website)**

⇩

**Affiliation Meanu**

⇩

**Click on Online Affiliation System**

⇩

**Click on Given Link**

⇩

**Login with Institute Affiliation Username and Password**